विश्वास वह पक्षी है जो प्रभात के पूर्व अंधकार में ही प्रकाश का अनुभव करता है और गाने लगता है।

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | सोमवार २४ फेब्रुवारी २०२५ | अंक ७७० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

All TOURS
SUN Tourism INTERNATIONAL PVT. LTD. Since 2007
घर से घर तक दिल से दिल तक
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

# राज्यातील सर्व आमदारांना छावा चित्रपट दाखवणार, अजित पवार यांनी केले नियोजन

## दिल्लीत मराठी भाषिकांसाठी भवन

दिल्लीत साहित्यिकांसाठी एक भवन व्हायला हवे, अशी मागणी विजय दर्डा यांनी केली होती. त्याची दखल घेत अजित पवार म्हणाले, दिल्लीत मराठी भाषिकांसाठी महाराष्ट्र भवन उभारले जाणार आहे. त्यासाठी लागणार निधी मंजूर केला जाईल. हे भवन उभारण्याची जबाबदारी मंत्री उदय सामंत यांच्याकडे दिली जाईल, असे अजित पवार यांनी म्हटले. महाराष्ट्र सदन हे खासदार आमदार यांच्यासाठी आहे. परंतु दिल्लीमध्ये महाराष्ट्रातील अनेक व्यक्ती आहेत, त्यांना एकत्रित भेटण्यासाठी सभागृह पाहिजे, यासाठी अर्थसंकल्पनात हा विषय मांडणार आहे, असे अजित पवार म्हणाले.

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर असलेल्या छावा चित्रपटाचे कौतूक सर्वत्र होत आहे. दिल्लीतील साहित्य संमेलनात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौतुक केले. छावा चित्रपटामुळे समाजापुढे संभाजी राजांची ओळख देशभरातील युवा पिढीला झाली. आता या चित्रपटासंदर्भात मोठा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यपाल सीपी राधाकृष्णन आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा चित्रपट पाहिला. त्यानंतर आता राज्यातील सर्व आमदारांना छावा चित्रपट दाखवण्यात येणार आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी आपली चर्चा झाली असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले. राज्याच्या विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन ३ मार्चपासून सुरु होत आहे. त्यानंतर ४ आणि ५ मार्च रोजी सर्व आमदारांना मंत्रालय समोर असलेल्या चित्रपट गृहात हा चित्रपट दाखवणार असल्याचे अजित पवार यांनी दिल्लीत सुरु असलेल्या अखील भारतीय साहित्य संमेलनाच्या समारोप प्रसंगी सांगितले.

### छावा चित्रपट मराठी आणवा

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी छावा चित्रपट पहिला आहे. त्याबद्दल संमेलनाच्या समारोपात बोलताना ते म्हणाले, छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवन चरित्र्याचा असलेला छावा चित्रपट हिंदीमध्ये आहे. छावा पाहताना अंगावर शहारे येतात. हा चित्रपट मराठीमध्ये आणावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. संजय नहार यांच्या सरहद संस्थेच्या कामाचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून कौतुक



अजित पवार म्हणाले, वढू आणि तुळापूरला संभाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारणार आहे. त्यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत चर्चा झाली आहे. संमेलानामध्ये राजकीय हस्तक्षेप होत आहे, अशी टीका कायम होते. आम्ही संमेलनाला आर्थिक मदत उपकार म्हणून करत नाहीत, तर भाषेला समृद्ध करण्यासाठी करतो. मराठी भाषेला अभिजीत भाषाचे दर्जा मिळाल्यानंतर पहिल्यांदाच संमेलन झाले. त्यामुळे त्याला विशेष महत्त्व आहे, असे अजित पवार यांनी म्हटले.

# संतोष देशमुख हत्या प्रकरणी संशयित पोलिस अधिकाऱ्यांना सहआरोपी करा-आ.सुरेश धस

केज । प्रतिनिधी केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील संशयित पोलीस अधिकाऱ्यांना सह आरोपी करण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थ व देशमुख कुटुंब करीत आहे. त्या अनुषंगाने आता आमदार सुरेश धस हे देखील संशयित पोलिस अधिकाऱ्यांना आरोपी करण्यात यावे अशी मागणी करत आहेत शनिवारी आमदार सुरेश धस हे केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांची भेट घेऊन पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्यासोबत चर्चा करून सदल गुन्ह्यातील संशयित पोलीस अधिकाऱ्यांना या गुन्ह्यामध्ये आरोपी करण्यात यावे अशी मागणी केली आहे. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्या विरुद्ध राज्यात आक्रमकपणे रान उठवून स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांना न्याय मिळवून देण्यासाठी आवाज उठून अनेक ठिकाणी मोर्चे काढले होते परंतु मंत्री धनंजय मुंडे यांची भेट घेऊन त्यांच्या तब्येतीची चौकशी केली असे माध्यमाशी बोलताना धस यांनी सांगितले होते. मंत्री धनंजय मुंडे यांच्या चौकशीची मागणी करणारे आमदार सुरेश धस यांनी त्यांची अचानक भेट घेतली. त्या नंतर राज्यात चर्चेची राळ उडाली. त्या सर्व चर्चेच्या पार्श्वभूमीवर आमदार सुरेश धस यांनी पुन्हा पत्रकार परिषद घेवून मंत्री धनंजय मुंडे यांच्या विरुद्ध अधिक आक्रमक होत त्यांच्या कृषी मंत्री व जिल्ह्याचे तत्कालीन पालक मंत्री यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले आहेत. दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी आमदार सुरेश धस यांनी संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेतल्या नंतर केज पोलीस ठाण्यात हजर झाले. त्यांनी प्रभारी पोलीस पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांची भेट घेतली. पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्याशी चर्चा करून आमदार सुरेश धस यांनी अशी मागणी केली की, संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींच्या संपर्क असलेले संशयित पोलीस



उपनिरीक्षक राजेश पाटील व तत्कालीन पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांना संतोष देशमुख हत्या प्रकरणी या दोन पोलीस अधिकाऱ्यांना सहआरोपी म्हणून गुन्हा दाखल करावा. अशी नागरिकांची मागणी असल्याचे त्यांनी सांगितले.

# वाळूची वाहतूक करणाऱ्याला जिल्हाधिकाऱ्यांचा दणका

बीड । प्रतिनिधी बंदी असताना देखील अवैधपणे वाळूची वाहतूक सुरूच आहे. अशा वाळू माफियां विरोधात प्रशासनाने कठोर पाऊले उचलण्यास सुरवात केली आहे. यानुसार अवैध वाळूची वाहतूक करणार्या डम्पर चालकांना बीड जिल्हाधिकार्यांनी नोटीस बजावल्या होत्या. या नोटिसी बाबत देण्यात आलेला खुलासा अमान्य करत जिल्हाधिकारी यांनी कारवाई करत १५० कोटी रुपयांचा दंड केला आहे. बीड जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठीआता महसूल प्रशासनाने ही कठोर पाऊल उचलायला सुरुवात केली आहे. प्रामुख्याने अवैधपणे वाळूचीवाहतूक करणार्यावर महसूल विभागाची नजर असून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.अशातच अवैध वाळू वाहतूक करणार्या ४० डंपर मालकांना तब्बल १५० कोटी रुपये दंड बीडच्या जिल्हाधिकार्यांनी ठोठावला आहे. जिल्ह्यात आता पर्यंतची हि मोठी दंडात्मक कारवाई आहे.यापूर्वी देखील अविद्या वाहतूक करणाऱ्यांना समज आणि नोटीस बजावण्यात आल्या होत्या मात्र कोणतीही परवानगी नसताना काही महसूल आणि पोलिसाना हाताशी धरून अवैध्य रित्या वाळू उपसा आणि वाहतूक केली जात होती त्यानुसार जिल्ह्यातील काही वाहतूक करणाऱ्या वाहन धारकांना जिल्हाधिकाऱ्यांनी नोटीस बजावली त्याचे उत्तर संबंधितांनी दिले

# शिवरायांच्या पुतळ्याचे सुशोभीकरण करण्यासाठी पाच लाख रुपयांचा निधी उपलब्ध

केज । प्रतिनिधी केज तालुक्यातील आनंदगाव सारणी येथे मोठ्या जल्लोषात शिवरायांचा पुतळा उभारण्यात आलेला आहे. छत्रपतींच्या जयंतीच्या अगोदर सदरील पुतळा उभारण्यात आल्याने गावकऱ्यांसह परिसरातील शिवप्रेमी आनंदी आहेत. आणि यातच आता आणखीन आनंदाची भर पडली असून शिवरायांच्या पुतळ्याच्या शुशोभीकरणासाठी



खा.रजनीताई पाटील यांच्या माध्यमातून पाच लक्ष रुपयांचा फंड बीड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे यांनी जाहीर केला आहे. तालुक्यातील आनंदगाव सारणी येथे शिवरायांचा पुतळा उभारल्यानंतर मोठ्या उत्साहात शिवजयंती साजरी करण्यात आली. आणि याचाच एक भाग म्हणून बीड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे यांनी शनिवारी दिनांक २२ फेब्रुवारी रोजी आनंदगाव येथे जाऊन शिवरायांच्या पुतळ्याला अभिवादन केले

# मराठा समाजाच्या परिषदेसाठी मुख्यमंत्र्यांनी १० मार्चपर्यंत वेळ द्यावी

मुंबई । प्रतिनिधी मराठा समाजाच्या परिषदेसाठी मुख्यमंत्र्यांनी १० मार्चपर्यंत वेळ द्यावी, अन्यथा अधिवेशन काळातच आंदोलन छेडू असा इशारा राज्यातील मराठा संघटनांनी दिला आहे. आज कोल्हापूरमध्ये राज्यातील ४२ मराठा संघटनांची एक परिषद पार पडली. या परिषदेमध्ये मराठा आरक्षणाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सुरुवातीला



सरकारशी संवाद साधू जर सरकारने प्रतिसाद दिला नाही तर आंदोलन छेडू असा निर्णय घेण्यात आला. कोल्हापुरात झालेल्या या परिषदेमध्ये १० टक्के मराठा आरक्षण मिळावं या मागणीवर ठामपणे चर्चा झाली. तसेच हात उंचावून अकरा ठराव मंजूर करण्यात आले. यामध्ये ओबीसी प्रवर्गातील ज्या सोयी सवलती आहेत त्या मराठा समजला आहे तशाच लागू कराव्या हा मुख्य मुद्दा या बैठकीमधून पाहायला मिळाला. हात उंचावून अकरा ठराव मंजूर १) महाराष्ट्र शासनाने ओ. बी. सी ममाजाला ज्या ज्या सोयी सवलती लागू केल्या आहेत. त्या जशाच्या तशा मराठा समाजाला सरसकट लागू करणेत याव्यात. २) हैद्राबाद गॅझेट, सातारा गॅझेट, बॉम्बे गॅझेटनुसार महाराष्ट्र शासनाने अमंलबजावणी करावी

# उस्मानाबाद-बीड-औरंगाबाद रेल्वे लाईनसाठी तपासणीचे आदेश

## १० फेब्रुवारीला खा.बजरंग सोनवणेंनी केली होती नव्या रेल्वे मार्गासाठी केंद्रीय मंत्र्यांकडे मागणी



केज । प्रतिनिधी उस्मानाबाद (धाराशिव)- बीड- औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) रेल्वे लाईन प्रकल्पाला मंजुरी देण्याची आणि ती जलद करण्याची मागणी दि.१० फेबुवारी रोजी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली होती. या मागणीची दखल घेत शिवजयंतीच्या मुहूर्तावर केंद्रीय मंत्र्यांनी संबधित रेल्वेमार्गाची तपासणी करण्याचे आदेश रेल्वे संचालकांना दिले आहेत. खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांना दिलेल्या पत्रात म्हटले होते. उस्मानाबाद-बीड- औरंगाबाद नवीन मार्ग प्रकल्पाचा २८ जुलै २०२२ रोजी रेल्वे बोर्डाला अहवाल सादर करण्यात आला. या प्रकल्पाची एकूण लांबी २४०.१५ किमी आहे. ज्याचा अंदाजे खर्च ४८५७.४७ कोटी रुपये आहे. मराठवाडा प्रदेशात अखंड कनेक्टिव्हिटी प्रदान करण्यासाठी, प्रवासाचा वेळ कमी करण्यासाठी आणि व्यापार आणि उद्योगासाठी नवीन मार्ग उघडण्यासाठी हा रेल्वे मार्ग महत्त्वाचा आहे. याव्यतिरिक्त, प्रस्तावित प्रकल्पाचा-२.४७ टक्केच्या परतावा दराने (आरओआर) आढावा घेण्यात आला आहे. ज्यामुळे रेल्वे नेटवर्कसाठी व्यवहार्य आणि फायदेशीर गुंतवणूक सुनिश्चित होईल. या प्रकल्पात राज्य सरकारसोबत खर्च वाटप मॉडेलचाही समावेश आहे. या प्रकल्पाचे धोरणात्मक महत्त्व लक्षात घेता, या रेल्वे मार्गाचे बांधकाम लवकरात लवकर सुरू करण्यासाठी आवश्यक निधीची मंजुरी आणि काम सुरु करण्यास प्राधान्य देणे. प्रकल्प अंमलबजावणीत आणखी विलंब होऊ नये म्हणून मंजुरी प्रक्रिया जलद करणे. सुरळीत अंमलबजावणीसाठी केंद्र आणि राज्य संस्थांमध्ये समन्वय साधणे यासाठी बीड जिल्ह्याचे खासदार प्रयत्नशील आहेत. हा रेल्वे मार्ग एक महत्त्वाचा दुवा म्हणून काम करेल. ज्यामुळे या प्रदेशात आर्थिक समृद्धी येईल आणि येथील रहिवाशांचे जीवनमान सुधारेल, असे म्हटले होते. यानंतर ९ दिवसाने म्हणजेच शिवजयंतीच्या मुहूर्तावर दि.१९ फेब्रुवारी रोजी केंद्रीय रेल्वेमंत्री यांनी पत्राव्दारे या प्रकल्पास मंजुरी देण्याबाबत प्रकल्पाची व्यवहार्यता व सुविधा तपासणी करण्याचे आदेश संबंधित संचालक यांना देण्यात आले आहेत.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार २४ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com



सं पा द की य

## ...तरच मातृभाषा संपन्न होईल !

नुकताच जागतिक मातृभाषा दिन संपन्न झाला. आजमितीला जागतिक पातळीवर सात हजाराहून अधिक मातृभाषा आहेत तर केवळ भारतात २२ प्रमुख भाषांसह सुमारे १३०० मातृभाषा आहेत. झपाट्याने होणारे जागतिकीकरण, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि अन्य भाषांनी मातृभाषेवर केलेली कुरघोडी यांमुळे अनेक मातृभाषा लोप पावत चालल्या आहेत. मातृभाषेचे संवर्धन व्हावे आणि त्या भाषेची संस्कृती टिकून राहावी यासाठी १९९९ पासून २१ फेब्रुवारी हा दिवस जागतिक मातृभाषा दिवस म्हणून साजरा केला जाऊ लागला आहे. एकाच मातृभाषेतील लोकांनी एकत्र येऊन मातृभाषेतील शिक्षण, साहित्य आणि संस्कृती यांबाबत चर्चा करून तिच्या संवर्धनासाठी ठोस कार्यक्रम आखावेत हा यामागील प्रमुख उद्देश आहे. सर्वाधिक भाषा बोलले जाणारे भारत हे जगातील एकमेव राष्ट्र असून भारतातही काही मातृभाषा लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत, तर काहींचा व्यवहारात होत असलेला वापर कमी होत चालला आहे. २१ फेब्रुवारीला जागतिक मातृभाषा दिन आणि २७ फेब्रुवारीला मराठी राजभाषा दिवस म्हणून राज्यात उत्साहाने साजरा केला जातो. या दिवशी समस्त मराठी भाषिक मंडळींकडून व्हाट्सअप वर मराठी भाषा दिनाच्या शुभेच्छा दिल्या जाता, मराठी भाषेचे गोडवे गाणाऱ्या कविता, गाणी आणि सुविचार सामाजिक माध्यमांच्या स्टेटस आणि स्टोऱ्यांवर ठेवले जातात. काही मंडळी या दिवशी एकमेकांशी आवर्जून मराठीत संवाद साधतात. सामाजिक संस्था, मंडळे, राजकीय पक्ष विविध उपक्रम राबवतात आणि त्यानिमित्ताने मराठी भाषेचे महत्व सांगणारी व्याख्याने दिली जातात. २७ फेब्रुवारीला शाळांतूनही मराठी राजभाषा दिवस उत्साहाने साजरा केला जातो मात्र दिवस सरला की दुसऱ्या दिवशी पुन्हा येरे माझ्या मागल्या. इंग्रजी भाषेने मातृभाषांवर केलेली घुसखोरी ही आज एक जटील समस्या बनली आहे. व्यवहारात पुढे जायचे असेल, तर इंग्रजीला पर्याय नाही हा मोठा गैसमज भारतीय जनतेत निर्माण झाल्यामुळे आज इंग्रजी आणि कॉन्व्हेंट शाळांमध्ये आपल्या पाल्यांना घालणाऱ्यांचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. महाराष्ट्रात त्यातही राज्यातील प्रमुख शहरांमध्ये हे प्रमाण वर्षागणिक वाढू लागले आहे, पाल्यांना इंग्रजी भाषा शिकण्यासाठी आणि त्यांचे इंग्रजीवर प्रभुत्व निर्माण होण्यासाठी पालकांकडून अतिरिक्त शिकवण्या लावल्या जातात. इंग्रजी भाषेचा सराव व्हावा यासाठी घरातही मुलांना इंग्रजीत संवाद साधण्याची सक्ती केली जाते. परिणामी मातृभाषा मराठी असूनही अशा मुलांना मराठी भाषा परकीय वाटू लागते. मराठी भाषेचे सौंदर्य आणि त्यातील पैलू यांना कधी उमगतच नाहीत. लहानपणापासूनच परकीय भाषेचे कित्ते गिरवल्याने मातृभाषेतील परवलीचे शब्द वगळता अन्य शब्दांचे ज्ञान या पिढीकडे मुळातच नसते. मातृषेतील शब्दभांडार, त्यातील सौंदर्य आणि त्यातील लेखन संपदा यांपासून ही पिढी दुरावू लागली आहे. हे असेच चालू राहिले, तर येणाऱ्या काही वर्षांत मराठी मातृभाषा औषधालाही शिल्लक राहील का, हा प्रश्नच आहे. मातृभाषेच्या संवर्धनासाठी व्यवहारिक पातळीवर इंग्रजीचे वाढलेले अवास्तव महत्व कमी करण्याची आवश्यकता असून राज्य पातळीवर मातृभाषेचाच अधिकाधिक वापर केला जायला हवा आणि त्यासाठी मातृभाषेविषयी पालकांमध्ये जागृती होणे अत्यंत महत्वाचे आहे. मूळ मराठी भाषेवर देववाणी संस्कृतचा प्रभाव असल्याने ती अधिक समृध्द आणि प्रगल्भ आहे. तिच्या प्रत्येक शब्दामध्ये अर्थ दडलेला आहे. राज्यातील संस्कृतीवर आरंभी इस्लामी आणि नंतर इंग्रजी आक्रमकांनी हल्ले केल्यामुळे येथील सध्याच्या बोली भाषेवर उर्दू आणि इंग्रजी भाषेचा प्रभाव अधिक जाणवतो. आपल्या नेहमीच्या बोलण्यातही एका वाक्यात दोन ते तिन परकीय शब्द आपण सहजपणे उच्चारत असतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक केल्यानंतर, मराठी भाषाशुद्धीचे प्रयत्न युद्धपातळीवर केले. परकीय शब्दांना हद्दपार केले. त्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकरांनीही मराठी भाषेला तिचे गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी आणि तिचे सौंदर्य खुलवण्यासाठी आपल्या कार्यकाळात अथक प्रयत्न केले. बोलीभाषेतील परकीय शब्द शोधून त्यांना पर्यायी मराठी शब्द शोधून काढले. त्यानंतरही अनेकांनी भाषाशुद्धीसाठी प्रयत्न केले आहेत. या सर्वांचे योगदान लक्षात घेऊन आपणही आपल्या मायमराठीला तिचे मूळ स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, जेणेकरून येणारी पिढी आपला वारसा पुढे चालवेल. आपल्या मालकीच्या वस्तूंविषयी आपली आसक्ती असते मग आपल्या मातृभाषेविषयी आपल्या मनात आकस का ? मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सर्वप्रथम तिच्याविषयी आपल्या मनात प्रेम निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे. आणि प्रेम तेव्हाच निर्माण होईल जेव्हा दैनंदिन व्यवहारात आपण तिचा अधिकाधिक वापर करू. वापर करणे म्हणजे केवळ मराठी बोलणे नव्हे, तर दैनंदिन व्यवहारात परकीय शब्द टाळून शुद्ध मराठी बोलणे. काही वस्तूंची निर्मितीच गेल्या काही वर्षांत झाली असल्याने त्यांना पर्यायी मराठी शब्द सध्यातरी नाहीत, असे शब्द वगळता ज्या ज्या शब्दांना पर्यायी मराठी शब्द आहेत, त्यांचा वापर तर आवर्जून केला पाहिजे. यासाठी घरी वाहिन्यांवर सासू सुनांच्या मालिका पाहण्याऐवजी मराठीतील पौराणिक आणि ऐतिहासिक मालिका पाहाव्यात. प्राचीन ग्रंथांचे आणि पुस्तकांचे वाचन करावे. इतरांशी बोलताना मग समोरचा कोणत्याही भाषेचा का असेना आपल्या बोलण्याची सुरुवात मराठीतच व्हायला हवी. आपल्या पाल्यांना स्वभाषेचे संस्कार घरातून नियमितपणे दिले गेले पाहिजेत. पाल्यांशी घरामध्ये शुद्ध मराठी भाषेतच संवाद साधायला हवा. त्यासाठी मुलांना सर्वप्रथम मम्मी-डॅडीफ ऐवजी आई-बाबा बोलायला लावा.

## देशातील आरोग्य व्यवस्था आणि अर्थसंकल्प

आदर्श जयंती अभियान राबवताना मुंबईत एका जयंती मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या घरी जावे लागले.कार्यकर्ते घरी नव्हते.सोईसाठी आपण त्यांना कांबळे साहेब म्हणू या. तर कांबळे साहेबांना फोन केला.ते म्हणाले, तुम्ही घरी जा,चहापाणी घ्या.तोपर्यंत मी येतोच आहे. घरी कसे जायचे वगैरे विचारून आम्ही २-४ जण त्यांच्या घरी गेलो. एसआरए योजनेत जात असलेली वस्ती. छोटेसे अभावग्रस्त घर.भिंतीवर फुले - शाहू - आंबेडकर यांच्या प्रतिमा, कोपऱ्यात बुद्धांची सुबक मूर्ती.घरातील दारिद्र्य हसऱ्या चेहऱ्याने झाकून कांबळे मॅडम यांनी आमचे स्वागत केले. अंग तापाने फणफणत होते. थंडी वाजू नये म्हणून साडी घट्ट ओढून घेतली होती.दोन चिल्लीपिल्ली खेळत - बागडत होती.अशा परिस्थितीत राहून एका खाजगी कंपनीत तुटपुंज्या पगारावर कंत्राटी कामगार म्हणून राबणारा हा कांबळे नावाचा कार्यकर्ता आदर्श जयंती साजरी करण्यासाठी धडपडत होता. घरातील परिस्थिती ओळखून सोबतची महिला कार्यकर्ती काही बहाणा करून बाहेर गेली. येताना दूध - चहा- साखर,मुलांना काही तरी खाऊ घेऊन आली. हे बघून कांबळे मॅडमचा बांध फुटला व महिला कार्यकर्तीच्या गळ्यात पडून त्या हुंदके देऊन रडू लागल्या. चार दिवसांपासून आजारी असलेल्या त्या गृहिणीच्या घरात फक्त शंभर दीडशे रुपये शिल्लक होते.अजून पगार व्हायला आठवडा जायचा होता. दवाखान्यात गेले व डॉक्टरला फी तसेच औषध म्हणून हे शंभर दीडशे रुपये खर्च झाले तर मुलांना खायला काय घालू,असा विचार करून ती मेडीकल स्टोअर्स मधून तापाची गोळी खावून मलेरिया अंगावर काढीत होती. पगार झाल्यावर दवाखान्यात जाईन असे मनाला व नवऱ्यालाही समजावत होती. हे पाहून सोबतच्या एका कार्यकर्त्याने ओळखीच्या डॉक्टरला फोन केला. दुसऱ्याने लहानग्या मुलाच्या हाती खाऊसाठी म्हणून थोडे पैसे दिले.तोपर्यंत कांबळे साहेब आले. हे सगळे सांभाळून जयंती साजरी करण्यासाठी जीवाचा आटापीटा करणाऱ्या त्या कार्यकर्त्याला बघून मन भरून आले.आदर्श जयंती शिकवायला गेलेलो आम्ही देशाच्या आर्थिक राजधानीत चाललेले आरोग्य व्यवस्थेचे धिंडवडे शिकून बाहेर पडलो ! वाचक हो ! सरकारी मेहेरबानीने महिन्याला पाच किलो धान्यावर जगणारी भारतातील ८० कोटी जनता आपले आजारपण अशाच पद्धतीने अंगावर काढते. संघटीत क्षेत्रांतील कामगारांची अवस्था थोडी बरी आहे. मामुली आजारपण आले तर कोणत्या तरी योजनेत अथवा मेडीक्लेम मध्ये ते धकून जातात. परंतु गंभीर आजार उद्भवला व घरातील बचत संपली कि,ते देखील कांबळे साहेबांच्या लाईनीत उभे राहतात ! स्त्रियांची अवस्था सगळ्यात वाईट. पितृसत्ताक व्यवस्थेमुळे त्यांचे आजारपण हा कधीही प्राधान्याचा विषय नसतो. म्हणजे गरीब,मध्यम वर्ग व स्त्रिया यांना देशातील आरोग्यव्यवस्था पिळून काढत आहे.विशेषतः गरीबांना तर आजारपणातील औषधोपचार हे मरणाहून महाग वाटत आहेत. ही परिस्थिती बदलायची कशी आणि कोणी ?. परिस्थिती बदलायची कशी ? या प्रश्नाचे उत्तर सोपे आहे. देशाच्या, राज्याच्या व जिल्हा परिषद,महानगर - नगरपालिका यांच्या अर्थसंकल्पात आरोग्यव्यवस्थेसाठी पुरेशी तरतूद करून ही परिस्थिती बदलू शकते. परंतु खाजगीकरणाच्या काळात सरकार नेमके तेच करीत नाहीये. उदाहरणार्थ, १ फेब्रुवारी २०२५ रोजी जाहीर झालेला केंद्र सरकारचा अर्थसंकल्प बघा. त्यानुसार केंद्र सरकार यावर्षी ५०,६५,३४५/- कोटी एवढा खर्च करणार आहे. त्यापैकी आरोग्य व्यवस्थेवर होणारा खर्च आहे फक्त ९९,०००/- कोटी म्हणजे साधारणपणे रुपये एक लाख कोटी ! एकूण अर्थसंकल्पाच्या निधीशी तुलना केली असता तो सुमारे २% एवढाच आहे. देशाची लोकसंख्या आहे १४५ कोटी ! या १४५ कोटी जनतेच्या आरोग्यासाठी अवघे १,००,०००/- कोटी खर्च करणाऱ्या सरकारच्या बालबुद्धीचे कौतुक करणारे गरीब,मध्यमवर्गीय व कांबळेंसारख्या गृहीणी नसणार,हे उघड आहे.आरोग्य सेवेबाबत जागतिक आरोग्य संघटनेने दर हजारी ३.५ खाटा असाव्यात,असा मापदंड ठरवला आहे. भारतात हे प्रमाण दर हजारी १.४ खाटा एवढे कमी आहे.सरकारी दवाखान्यांत तर दर हजारी ०.८ खाटा एवढे कमी प्रमाण आहे. याचा अर्थ असा कि,भारताला सध्या २४ लाख खाटांची गरज आहे. जागतिक आरोग्य संघटनेने डॉक्टरचे प्रमाण देखील ठरवून दिले आहे. एक हजार रुग्णांमागे एक डॉक्टर असे ते प्रमाण आहे. भारतात मात्र एक हजार पाचशे अकरा रुग्णांमागे एक डॉक्टर असे विदारक प्रमाण आहे. त्याचप्रमाणे दर तीनशे रुग्णांमागे एक नर्स असेही प्रमाण आहे. भारतात सहाशे सत्तर रुग्णांमागे एक नर्स असे प्रमाण आहे.ग्रामीण भारतात सुमारे ७० टक्के जनता राहते. परंतु ग्रामीण भागातील जनतेसाठी देशातील एकूण खाटांपैकी फक्त ४० टक्के खाटा उपलब्ध आहेत. खाजगी दवाखाने महागडे असल्यामुळे तेथील उपचार सामान्य जनतेला परवडत नाहीत. संख्येने कमी असलेले सरकारी दवाखाने त्यांच्या क्षमतेपेक्षा जास्त सेवासुविधा देतात. परंतु त्यांना पुरेसा निधी मिळत नाही. शिवाय अनेकदा आरोग्य सेवेसाठी तरतूद केलेला निधी देखील पूर्णतः खर्च होत नाही. भारतातील आरोग्य सेवेबाबत सगळ्यात धक्कादायक प्रकार म्हणजे देशीतील आरोग्य व्यवस्थेवरील खर्चापैकी ६२.६ टक्के म्हणजे सुमारे ६३ टक्के खर्च हा रुग्णांना स्वतःच्या खिशातून करावा लागतो. हा जगातील एक सर्वाधिक खर्च समजला जातो. अर्थसंकल्पात या समस्यांची उत्तरे नाहीत. परिणामी संख्या व साधनसामग्री या दोहोंमध्ये मार खाणारी भारतातील आरोग्यव्यवस्था जनतेचे आरोग्याचे प्रश्न सोडविण्यास असमर्थ ठरली आहे. म्हणून बाळंतपणात आईचा मृत्यु म्हणजे इंग्रजीत मॅटरनल मोटलिटी रेट (एमएमआर) हा आपल्या देशात दर लाखामागे ९७ एवढा आहे. आर्यलँड या देशात तो ङ्गएक लाखामागे शून्यफ असा गौरवास्पद आहे. विकसित देशांत तो साधारणपणे दर लाखांमागे ११ एवढा कमी आहे. या पार्श्वभूमीवर स्वतः ला विश्वगुरु समजणारा भारत जागतिक स्तरावर किती मागासलेला आहे,हे समजून येते. देशाच्या अर्थसंकल्पांत या समस्यांची उत्तरे नाहीत. या समस्यांचे निराकरण करायचे असेल तर विकसित देशांप्रमाणे एकूण सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या (जीडीपी) सहा टक्के निधी आरोग्यावर खर्च करायला हवा. भारताचे सकल राष्ट्रीय उत्पन्न ४.७/- ट्रिलियन म्हणजे चार लाख सत्तर हजार अमेरिकन डॉलर्स एवढे आहे. भारतीय रुपयांत पाहू गेल्यास ३७४/- लाख कोटी एवढे भारताचे सकल राष्ट्रीय उत्पन्न आहे. त्याच्या सहा टक्के म्हणजे २२.४४/- लाख कोटी ! याचा अर्थ असा कि, देशाच्या अर्थसंकल्पात आरोग्य व्यवस्थेसाठी २२.४४/- लाख कोटी एवढी तरतूद करायला हवी. असे नियमितरित्या झाल्यास देशातील आरोग्यव्यवस्था नक्कीच सुधारेल ! तथापि, त्यासाठी गरीब कांबळे, मध्यमवर्ग व स्त्रिया या गरजू जनतेनेच आवाज उठवायला हवा ! जिथे सख्खी आई देखील स्वतःचे लेकरू रडल्याशिवाय त्याला दूध पाजीत नाही तिथे सरकार जनतेच्या दबावाशिवाय काही करेल,अशी अपेक्षा करणे व्यर्थ आहे.

## ही आहेत किडनी खराब झाल्याची ७ मोठी लक्षणं, ७ वी गोष्ट तर हळूहळू पोखरते शरीर

मुंबई-आपले शरीर आपल्या तब्येतीसंदर्भात अनेक संकेत वेळोवेळी देते. विशेषतः किडनी हा शरीराचा एक अत्यंत महत्त्वाचा अवयव आहे, जो रक्त शुद्ध करण्यापासून ते पाण्याचे प्रमाण नियंत्रित करण्यापर्यंत अनेक महत्त्वपूर्ण कार्ये पार पाडतो. परंतु अनेकदा आपण किडनीशी संबंधित समस्या ओळखण्यास असमर्थ ठरतो आणि त्यामुळे भविष्यात गंभीर त्रास सहन करावा लागू शकतो. आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत, अयोग्य आहार, अपुऱ्या पाण्याचे सेवन आणि वाढता तणाव यामुळे किडनीचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. सुरुवातीच्या काळात किडनीच्या समस्यांचे सूक्ष्म संकेत मिळू शकतात. पण त्याकडे दुर्लक्ष केल्यास ते गंभीर आजारात परिवर्तित होऊ शकतात. म्हणूनच, शरीर कोणते संकेत देत आहे, हे ओळखणे अत्यंत गरजेचे आहे. या लेखात आपण किडनीच्या कार्यात बिघाड होत असल्यास शरीर कोणत्या सात महत्त्वाच्या सूचना देऊ शकते याची माहिती घेणार आहोत. जर हे संकेत वेळेवर ओळखले गेले, तर योग्य उपचार आणि जीवनशैलीत सुधारणा करून किडनीचे आरोग्य टिकवून ठेवता येईल. सतत थकवा जाणवणे- किडनी योग्य प्रकारे कार्य करत नसल्यास शरीरातील विषारी घटक बाहेर टाकले जात नाहीत, परिणामी रक्त शुद्ध राहू शकत नाही. अशा वेळी शरीराला पुरेशी ऊर्जा मिळत नाही आणि सतत थकवा जाणवतो. काही जणांना दिवसभर झोपल्यावरही दमल्यासारखे वाटते. हे किडनीच्या कार्यक्षमतेत घट झाल्याचे सूचक असू शकते. मूत्राच्या रंगात आणि प्रमाणात बदल-किडनीचे आरोग्य ठणठणीत असेल, तर लघवीचा रंग सौम्य पिवळसर असतो आणि प्रमाणही समतोल असते. परंतु मूत्राचा रंग गडद होणे, जास्त फेसाळलेले दिसणे किंवा वारंवार लघवीला जावे लागणे, हे किडनीच्या कार्यात बिघाडाचे संकेत असू शकतात. विशेषतः रात्री वारंवार लघवीला जावे लागत असल्यास किडनीच्या तपासणीसाठी तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. शरीराच्या वेगवेगळ्या भागात सूज येणे-किडनी जर व्यवस्थित काम करत नसेल, तर शरीरातील पाणी आणि क्षार यांचे संतुलन बिघडते. परिणामी, शरीरात अनावश्यक पाणी साठून राहते आणि चेहरा, पाय, टाचा आणि हात सुजण्याची शक्यता असते. ही सूज जर दीर्घकाळ राहिली, तर तातडीने वैद्यकीय तपासणी करणे गरजेचे आहे. भूक मंदावणे आणि अन्न खाण्याची इच्छा न होणे-किडनीच्या कार्यात अडथळा आल्यास शरीरात विषारी घटक साचू लागतात आणि त्यामुळे भूक मंदावते. काही वेळा अन्न खाल्ल्यानंतर मळमळ वाटणे, उलटी होणे किंवा पचनास अडथळा येणे ही लक्षणेही जाणवू शकतात. किडनीच्या आरोग्यासाठी पुरेसा आहार आणि योग्य पोषण घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्वचेवर खाज सुटणे त्वचेवर खाज सुटणे त्वचेवर खाज सुटणे आणि कोरडेपणा जाणवणे-किडनीचे आरोग्य बिघडल्यास रक्तातील खनिजे आणि पोषणतत्त्वांचे संतुलन बिघडते, परिणामी त्वचा कोरडी पडते आणि सतत खाज सुटण्याची समस्या निर्माण होते. कधीकधी त्वचेवर पुरळ, खूप कोरडेपणा किंवा खाज येऊ लागल्यास याकडे दुर्लक्ष करू नये. हे किडनीच्या अशक्तपणाचे स्पष्ट लक्षण असू शकते. श्वास घेताना त्रास जाणवणे-किडनी योग्यप्रकारे कार्य न केल्यास शरीरात अनावश्यक द्रव्य साचू लागते आणि त्यामुळे फुफ्फुसांवर दडपण येते. परिणामी, काही लोकांना थोडे चालल्यावर किंवा जिने चढताना दम लागतो. हा लक्षणे किडनीच्या कार्यक्षमतेत घट झाल्याचे संकेत असू शकतात. रक्तदाब अनियंत्रित होणे-किडनी आणि रक्तदाब यांचा परस्पर संबंध असतो. किडनी रक्तातील सोडियम आणि पाण्याचे प्रमाण नियंत्रित करत असल्यामुळे, जर किडनी कमजोर झाली, तर रक्तदाब अनियंत्रित होतो. त्यामुळे अनियमित रक्तदाब ही समस्या दीर्घकाळ सुरू असल्यास किडनीच्या आरोग्यासंबंधी तपासणी करणे गरजेचे आहे. किडनीचे आरोग्य दीर्घकाळ टिकवून ठेवण्यासाठी या सात लक्षणांकडे लक्ष देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जर वेळेवर किडनीच्या समस्यांचे निदान झाले, तर योग्य आहार, पुरेशी पाण्याचे सेवन आणि जीवनशैलीत सुधारणा करून किडनीचे आरोग्य सुधारता येते. त्यामुळे शरीरातील बदलांकडे दुर्लक्ष करू नका आणि वेळोवेळी वैद्यकीय सल्ला घ्या

## कर्मयोगी संत गाडगे महाराज

महाराष्ट्रातील थोर संत, किर्तनकार, समाजसुधारक, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खंदे समर्थक, स्वच्छतेचे पुढारक संत गाडगे महाराज यांची आज जयंती. संत गाडगे महाराज यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. त्यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे झाला. ते त्यांच्या आईच्या माहेरी, मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे लहानाचे मोठे झाले. त्यांच्या मामाची मोठी शेती होती. त्यांनाही शेतीची आवड होती विशेषतः गुरांची निगराणी करण्यास त्यांना खूप आवडे. १८९२ साली गाडगे महाराजांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारशाला त्यांनी गावकऱ्यांना गोडधोडाचे जेवण दिले त्याकाळच्या परंपरेला हा छेद होता कारण त्याकाळी कोणत्याही कार्यक्रमात गावकऱ्यांना दारू आणि मटण दिले जात, ही परंपरा त्यांनी मोडून काढली. लहानपणापासून अन्याय, अत्याचार, अंधश्रद्धा, कर्मठ रूढी परंपरा, कर्मकांड यावर त्यांनी कठोर प्रहार केले. १ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घरदाराचा त्याग करुन संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन स्वीकारले. अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडला असल्यास त्याला आपण होऊन मदत करायला धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा न धरता ते आपल्या वाटेने निघून जायचे. ते सतत एक खराटे जवळ बाळगत. अंगावर गोधडीवजा फाटके तुटके कपडे आणि एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असत त्यामुळेच लोक त्यांना गाडगेबाबा म्हणत. ते ज्या गावात जात ते गाव खराट्याने स्वछ करीत. सार्वजनिक स्वछता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्वे समाजात रुजवण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अरिष्ट रूढी, परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले उभे आयुष्य वेचले. विवेकाच्या खराट्याने गावोगावी फिरुन त्यांनी लोकांची मने स्वच्छ केली त्यासाठी ते गोवोगावी जाऊन कीर्तने केली.



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
मो.९९२२५४६२९५

## अमित शाह वारंवार नकली राष्ट्रवादी आणि नकली शिवसेना यावर का बोलतात?

### महाराष्ट्रात आल्यावर भाजपाचे काय, एवढ्यावरच बोललं पाहीले ना!



बीड। प्रतिनिधी दोन खासदार असलेली भाजपा सत्तेत आल्यानंतर प्रत्येक नेत्याला अभिमान वाटने हे सहाजिक आहे. भाजपा चांगल्या स्थितीत यासाठी प्रयत्न करणे प्रत्येक भाजप नेत्याची जबाबदारी आहे परंतू गेल्या काही महिन्यात भाजपाचे नेते अमित शाह महाराष्ट्रात आल्यानंतर कोणती शिवसेना असली व कोणती राष्ट्रवादी असली व कोण नकली यावर बोलताना दिसतात. खरं पाहीलं तर त्यांनी दुसऱ्या पक्षाचा आसली नकली पाहण्यापेक्षा स्वतःचा पक्ष बळकट आणि मजबूत करण्यासाठी व त्याच्या आसलीपणाचे दाखले देण्यासाठी भाष्य करायला हवे. परंतू तसे होताना दिसत नाही. देशाच्या आणि राज्याच्या राजकारणामध्ये भाजपाने मोठी मुसंडी मारली हे कौतूकास्पद आहेच. देशामध्ये दोन खासदार असलेल्या पक्षाला सलग तिनदा केंद्रात सत्ता स्थापन करण्याची संधी मिळतेय याचे कौतुक झालेच पाहीजे. महाराष्ट्रामध्ये शिवसेनेच्या बोटाला धरून सत्तेमध्ये सहभागी झालेल्या भाजपाने शिवसेनेसमोर आपण छोटा भाऊ असल्याचे अनेकदा म्हटले. परंतू छोटा भाऊ मोठा झाल्यानंतर मोठा भाऊ असलेल्यार शिवसेनेतच फुट पडली. असे असताना आजच्या स्थितीत भाजपाच्या प्रमुख नेत्यांपैकी एक असलेले अमित शाह हे जेव्हा जेव्हा महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येतात तेव्हा तेव्हा नकली शिवसेना आणि नकली राष्ट्रवादी यावर भाष्य करतात. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत फुट पडल्यानंतर फुटलेल्या गटाने भाजपाला साथ दिली हे खरे आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फुट पडल्यानंतर फुटलेल्या गटाने भाजपाला साथ दिली हे ही सत्यच आहे. या दोघांच्या मदतीने भाजपाला सत्ता मिळाली. परंतू आता अमित शाहजी स्वतःच्या पक्षाच्या संदर्भात बोलण्यापेक्षा विरोधी पक्ष असलेल्या शरद पवारांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला नकली म्हणण्यात जास्त आनंद मानत आहेत. वास्तविक पाहता भाजपामध्ये आलेले किती नेते शरद पवारांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीतून आले, ज्या काँग्रेसला शिव्या देत सर्वच भाजप नेत्यांचे तोंड कायम सुरू असते त्यांच नेत्यांना काँग्रेसमधून आलेल्या व भाजपवासी झालेल्या नेत्यांचे कौतूक करावे लागते. भाजपाला वाढविण्यासाठी भाजपाचे झेंडे उचणारे, सतरंज्या झटकणारे कार्यकर्ते आणि नेते आजच्या स्थितीला पडद्यामागे दिसतात. बाहेरून आलेल्या नेत्यांचीच चलती असल्याचे जुने नेते बोलतातही अशा अवस्थेत शहांनी नकली शिवसेना आणि नकली राष्ट्रवादी यावर भाष्य करण्यापेक्षा आसली भाजपा आहे का? किंवा भाजप वाढीवर, भाजप संघटन मजबूत करण्यावर अधिक भर दिला तर चांगले राहीलं अशी चर्चा सामान्य लोकांमध्ये व्यक्त होत आह

## युवापर्व सामाजिक संघटनेच्या वतीने शिवशाहीर नवले यांच्या पोवाड्याचे आयोजन.



पालवण प्रतिनिधी -- पालवन येथील सामाजिक कार्यात सदैव तत्पर असणाऱ्या युवापर्व या सामाजिक संघटनेकडून शिवजन्मोत्सव विशेष म्हणून शिवशाहीर शरद नवले यांच्या पोवाड्याच्या कार्यक्रम ाचे आयोजन पालवन या ठिकाणी दि.२५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सात वाजता रेणुका महाविद्यालयाच्या पाठीमागील बाजूस आयोजित केले आहे. सदरील कार्यक्रमाला विशेष उपस्थिती म्हणून मनोज जरांगे पाटील उपस्थित असणार आहेत, तरी जवळील सामान्य तसेच शिवप्रेमींनी या कार्यक्रमाचा आनंद घ्यावा असे आवाहन युवा पर्व सामाजिक संघटनेच्या वतीने करण्यात आलेले आहे.

अगदी काही दिवसापूर्वीच शिवजन्मोत्सव अगदी थाटा माठात सगळीकडे साजरा करण्यात आला तर काही ठिकाणी अजून सुद्धा शिवजन्म महोत्सव निमित्त विविध कार्यक्रम सुरूच आहेत. याच पार्श्वभूमीवर येत्या २५ तारखेला बीड जिल्ह्यातील पालवन या ठिकाणी युवा पर्व सामाजिक संघटनेच्या वतीने शिवशाहीर नवले यांच्या पोवाड्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. तर या पोवाड्याच्या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती मनोज जरांगे पाटील हे येणार असून सदरील कार्यक्रम हा रेणुका विद्यालयाच्या पाठीमागच्या बाजूस पाल-वन या ठिकाणी संपन्न होणार आहे.

पालवन येथील युवापर्व या सामाजिक संघटनेने पुढाकार घेऊन सदरील कार्यक्रम ाचे आयोजन केलेले आहे तरी पंचक्रो-शीतील शिवप्रेमींनी २५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सात वाजता सदरील कार्यक्रम ाचा आनंद लुटावा असे आवाहन युवा पर्व या सामाजिक संघटनेच्या वतीने करण्यात आलेले आहे.

बीड/महाराष्ट्र
विशेष वार्ता

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

सोमवार २४ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com



# रानडूकराच्या हल्ल्यात शेतकरी गंभीर जखमी



माजलगाव । प्रतिनिधी माजलगाव मतदार संघातील तिन्ही तालुक्यांमध्ये रानडुकराचे मोठ्या प्रमाणात प्रस्थ निर्माण झाले आहे रानडुकरामुळे शेतातील पिकाचे अतोनात नुकसान होत आहे त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या पिकाचे संरक्षण करण्यासाठी रात्री-अपरात्री शेतात जावे लागते त्याप्रमाणे किसनराव डोईजड हे आपल्या शेतात गेले असता रानडुकराने त्यांच्यावर हल्ला केल्याने यामध्ये ते गंभीर जखमी झाले आहेत. माजलगाव तालुक्यातील शहाजानपूर गावासह परिसरात रानडुकरांनी थैमान घातले आहे. रब्बी हंगामातील गहू, ऊस,ज्वारी,हरभरा आधी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान रानडुक्कर करत आहेत म्हणून शेतकऱ्यांना आपल्या शेतात जाऊन रात्री-आप रात्री गस्त घालावी लागत आहे.अशीच गस्त घालण्यासाठी गेलेले परमेश्वर किसनराव डोईजड हे शेतात रानडुकरा पासून आपल्या पिकाचे संरक्षण करण्यासाठी गस्त घालत असताना अचानक रानडुकराने त्यांच्यावर हल्ला केला त्यामध्ये ते गंभीर जखमी झाले आहेत त्यांच्यावर माजलगाव येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत रानडुकरांचे वाढते थैमान कुठेतरी आवरायला हवे अशी मागणी शहाजानपुर गावकऱ्यासह परिसरातील नागरिकाकडून वन विभागाकडून व्यक्त केली जात आहे



बीड : राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या जयंतीनिमित्त शहरातील यशवंत उद्यानात अर्धाकृती पुतळ्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी अभिवादन केले. यावेळी नगरसेवक शुभम धुत, विठ्ठल गुजर, शुभम कातांगळे, आमेर सिद्दीकी, शंकर व्यवहारे, प्रधान पवार, मोहन राऊत, दादासाहेब नन्नवरे, रमेश घोडके, सागर वाव्हुळ, पांडुरंग जानवळे, सतिश मुळे, महादेव नन्नवरे, विलास जाधव, आदित्य रोकडे यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केजच्या नगराध्यक्षा सीतातार्इ बनसोड यांना जागतिक स्त्रीरत्न पुरस्कार जाहीर



बीड प्रतिनिधी कसलाही शैक्षणिक, सामाजिक, राजकीय वारसा नसताना प्रतिकूल परिस्थितीवर मात करत सीताताई प्रदीप बनसोड यांनी उच्च शिक्षण घेतले. एवढेच नव्हे तर केज नगरीच्या सर्वाधिक कुशल आणि विकसनशील नगराध्यक्ष म्हणून त्यांनी सन्मान मिळवला आहे. शून्यातून विश्व कसं निर्माण करावं याचं प्रतीकात्मक रूप म्हणजेच सीताताई प्रदीप बनसोड होय. त्यांच्या या अभूतपूर्व कार्याची दखल घेऊन त्यांना पत्रकार संघ आणि आश्रय सेवा केंद्राच्या वतीने जागतिक महिला दिनी जागतिक स्तरावरील स्त्रीरत्न पुरस्काराने मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. अमरावती जिल्ह्यातील येवदा या खेड्या गावामध्ये अतिशय सामान्य कुटुंबात सीताबाई यांचा देविदास बागडे कुटुंबीयात जन्म झाला.मजुरी करून वडील कसं बस कुटुंब चालवत होते. मात्र लहानपणापासूनच शिक्षणाची आवड असल्याने आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आत्मसात केल्याने शिक्षण हे वाघिणीचे दूध समजून सत्तेच्या खुर्चीवर जाण्याचे स्वप्न ज्यावेळी पोटभर एक वेळचं जेवण धड मिळत नव्हतं अशा परिस्थितीत त्यांनी पाहिलं. आणि स्वकर्तृत्वावर कुठलाही शैक्षणिक सामाजिक राजकीय वारसा नसतानाही त्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत एक इंग्रजीच्या अध्यापक पासून यशस्वी सामाजिक कार्यापर्यंत आणि पुढे थेट केज नगरीच्या नगराध्यक्ष म्हणून त्यांनी यशस्वी शैक्षणिक सामाजिक आणि राजकीय गरुड झेप घेतली आहे.

# स्थानिक गुन्हे शाखेकडून घरफोडी करणारा आरोपी गजाआड

बीड । प्रतिनिधी दिनांक १४/०२/२०२५ चे २१:०० ते दिनांक १५/०२/२०२५ रोजीचे ०६:०० वाजेच्या दरम्यान अंबाजोगई शहरातील माऊली नगर, यशवंतराव चव्हाण चौकात घडफोडी झाल्याबाबत पोलीस स्टेशन अंबाजोगई शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ८८/ २०२५ कलम ३०५, ३३१(४) बी.एन.एस. प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा करत असतांना पोलीस निरीक्षक स्था.गु.शा. यांचे आदेशाने घरफोडीचे व वाहन चोरीचे गुन्ह्यांतील आरोपी व मुद्देमालाचा शोध घेत असतांना स्था.गु.शा.चे पथकास अंबाजोगई शहरातील पोलीस कॉर्टर्स समोर राहणारा जुन्नीसींग इंदलसिंग टाक याने अंबाजोगई शहरात घरफोडी केल्याबाबत गोपनीय माहीती मिळाली. त्यावरुन स्था.गु.शा.चे पथकाने संशयीत आरोपी जुन्नीसिंग इंदलसिंग टाक याचा त्याचे राहते घरी शोध घेतला असता तो मिळुन आल्याने त्यास त्याचे नाव गांव विचारल

# पाटोदा पशुवैद्यकीय कार्यालय वाऱ्यावर
## अधिकारी, कर्मचारी सतत गैरहजर,सि.ई.ओ.नी लक्ष द्यावे

पाटोदा येथे पशुवैद्यकीय कार्यालयात सावळा गोंधळ चालू असून हे कार्यालय दि.२१ शुक्रवार रोजी अकरा वाजून पंचवीस मिनिटांपर्यंत उघडले नव्हते अधिकाऱ्यांनी व कर्मचारी यांनी वाऱ्यावर कार्यालय सोडले असून याकडे मात्र कोणीही लक्ष देत नसून वारंवार या कार्यालयात सतत कर्मचारी गैरहजर असून कधी येतात कधी येत नाहीत दिवस दिवस कार्यालय बंद असते तरी तात्काळ जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी व गट विकास अधिकारी पंचायत समिती पाटोदा यांनी लक्ष देऊन तात्काळ संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याची मागणी होत आहे. याबाबत अधिक माहिती अशी की शेतकऱ्याच्या निगडित असणारी पशुवैद्यकीय तालुका कार्यालय पाटोदा येथील अधिकारी व कर्मचारी हे सतत गैरहजर असतात वारंवार शेतकऱ्यांच्या तक्रारी असूनही याकडे मात्र तालुका पशुवैद्यकीय अधिकारी हे दुर्लक्ष करत असून यांचे कार्यालय कधी चालू तर कधी बंद अशी अवस्था चालू असून दि.२१ रोजी शुक्रवार अकरा वाजून पंचवीस मिनिटापर्यंत या ठिकाणी कार्यालय बंद



होते याकडे मात्र कोणीही लक्ष देत नसून यामुळे शेतकऱ्यांच्या अडचण निर्माण होत आहे तरी याकडे तात्काळ लक्ष देऊन जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी व गटविकास अधिकारी पंचायत समिती पाटोदा यांनी लक्ष देऊन संबंधितावर दि.२१ रोजी कार्यालय बंद ठेवणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी होत आहे.याबाबत गटविकास अधिकारी पंचायत समिती वानखेडे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी तात्काळ कार्यालय वेळेवर न उघडल्याने नोटीस पाठवतो असे दुरध्वनी द्वारे म्हटलेआहे

# चुंबळी फाटा मार्गे जाणाऱ्या लांब पल्ल्याच्या बसगाड्या पाटोदा शहरातून सोडण्याची मराठी पत्रकार परिषदेची मागणी

पाटोदा हा तालुक्याचे ठिकाण असुन सुध्दा पाटोदा आगारात अनेक बसगाड्या न येता चुंबळीफाटा येथुन बसेस जातात त्यामुळे प्रवाशांच्या हेडसांड होत असुन वारवार मागणी करूनही दुर्लक्ष होत असल्याने मराठी पत्रकार परिषद पाटोदा शाखेच्या वतीने आंदोलनाचा इशारा दिला आहे. पाटोदा शहर २०हजार लोकसंख्येचे पाटोदा शहर मोठे असुन देखील पाटोदा बसस्थानकात या बस येत नसल्याने याचा फटका प्रवाशांना सहन करावा



लागत आहे.चुंबळीफाटा येथुन जाणारे विविध आगाराचे ५०गाड्या पुणे, बीड, धारुर , उमरखेड, यवतमाळ,जालना, चिपळुण या ठिकाणी जातात त्यातील लांब पल्ल्याच्या बसगाड्या पाटोदा बसस्थानकात येण्याचे बंधनकारक करावे.तसेच पाटोदा बसस्थानकात रात्री नियंत्रक नसतात त्यामुळे आगारात रात्री काही अनुचित प्रकार घडू शकतात त्यामुळे रात्री नियंत्रकाची नियुक्ती करण्यात यावी वरील मागण्यासंदर्भात लवकरात लवकर निर्णय घ्यावा नसता ३मार्च रोजी एक दिवसीय लाक्षणिक उपोषण मराठी पत्रकार परिषद शाखा पाटोद्याच्या वतीने आपल्या बसस्थानकात उपोषण करण्यात येईल असा इशारा मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने देण्यात आला. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे तालुका अध्यक्ष अजय जोशी, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष कादर मकराणी,मराठी पत्रकार परिषदेचे तालुका कार्याध्यक्ष सोमनाथ खंडागळे,सचिव हमीद पठाण, तालुका उपाध्यक्ष जावेद शेख, अशोक भवर,हल्ला कृती समिती तालुका अध्यक्ष संजय सानप, कोषाध्यक्ष दत्ता देशमाने,सतिश गर्जे,आदी उपस्थित होत

# वकिलावर प्राणघातक हल्ला: चार जणाविरुद्ध गुन्हा दाखल

नेकनूर, (प्रतिनिधी) नेकनूर येथे मंगळवारी रात्री एका वकिलावर प्रकरणाची पैरवी करत असल्याच्या कारणावरून प्राणघातक हल्ला करण्यात आला. याप्रकरणी चार जणांविरुद्ध नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेख असलम आरेफ नदीम (वय ३५, रा. दर्गा कॉलनी, नेकनूर) असे जखमी वकिलाचे नाव आहे. ते गेल्या १२ वर्षांपासून बीड जिल्हा व सत्र न्यायालयात खाजगी वकिली व्यवसाय करतात. त्यांनी हायकोर्टातील वकील देशपांडे यांच्या सोबत नेकनूर गावातील गट क्र. ५३७/आ संदर्भातील एक दिवाणी प्रकरण हाताळले होते. दि. १२ फेब्रुवारी रोजी रात्री १०.१५ वाजता, जेवणानंतर घरी जात असताना सय्यद राशेद सय्यद मुस्ताक, सय्यद उमेर सय्यद राशीद, सय्यद जुबेर सय्यद राशीद आणि सय्यद सुमेर सय्यद राशीद (सर्व रा. नेकनूर, ता. बीड) यांनी त्यांना अडवले. तू प्रकरणाची पैरवी करतो म्हणून आमचा वाद मिटत नाही असे म्हणत सय्यद राशेद याने हातातील कुऱ्हाडीने त्यांच्यावर हल्ला केला. त्यांनी बचाव करताना डाव्या हातावर कुऱ्हाडीचा वार होऊन हात जखमी झाला. त्यानंतर सय्यद उमेर याने लोखंडी पाइपने त्यांच्या डाव्या बरगडीवर प्रहार केला, तर सय्यद जुबेर आणि सय्यद सुमेर यांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी जखमी वकील मदतीसाठी ओरडले असता सय्यद हामीद सय्यद मुस्ताक, सय्यद जाहेद सय्यद मुस्ताक, सय्यद नवीद काझी, मोईजोद्दीन आणि सायबा पवार यांनी घटनास्थळी धाव घेत वाद सोडवण्याचा प्रयत्न केला. जर प्रकरण मिटवले नाही तर तुला जिवे मारू आणि खोट्या केसमध्ये अडकवू अशी धमकी आरोपींनी दिली. जखमी वकिलास तातडीने नेकनूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर पुढील उपचार सुरू आहेत. या प्रकरणी नेकनूर पोलीस ठाण्यात चार जणांविरुद्ध गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास नेकनूर पोलीस करत आहे

# पवित्र रमजानच्या अनुषंगाने मुस्लिम बहुल भागात सोयी-सुविधा सुरळीत करा

बीड-प्रतिनिधी पुढील महिन्याच्या सुरुवातीच्या दिवसांमध्येच पवित्र रमजान महिना सुरू होत आहे. या अनुषंगाने बीड शहरातील सर्वच प्रभागातील मुस्लिम बहुल भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, विद्युत जोडणी, स्वच्छतेची कामे लवकरात लवकर करून घ्या. अशा सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड नगरपरिषद प्रशासनाला दिल्या आहेत. यावर्षी पवित्र असलेला रमजान महिना मार्च महिन्याच्या सुरुवातीपासूनच येणार आहे. पवित्र रमजान महिन्याच्या आगमनानंतर मुस्लिम बांधव पूर्ण महिनाभर कडक उपवास आणि अल्लाह ची उपासना करतात. त्यामुळे विविध सोयी सुविधा सुरळीतपणे उपलब्ध झाल्या पाहिजेत. त्यामुळे शहरातील सर्वच प्रभागातील मुस्लिम बहुल भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था सुरळीत करणे, विद्युत जोडणी पूर्ण करणे तसेच परिपूर्ण स्वरूपात स्वच्छतेची कामे करणे इत्यादी कामे प्राधान्याने, पवित्र रमजान महिना सुरू होण्यापूर्वीच करून घ्यावेत अशा सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी नगरपरिषद प्रशासनाला दिल्या आहेत.

# गढी-माजलगाव महामार्गावरील दुचाकी, चारचाकी वाहनाचा अपघात

## अपघातात एक जागीच ठार

गेवराई । प्रतिनिधी नातेवाईकांना भेटण्यासाठी आपल्या दुचाकीवरून जात असलेल्या एका ऊसतोड कामगारांचा कल्याण - विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्गावरील अर्धा मसला शिवारात समोरच्या चारचाकी वाहनांच्या धडकेत जागीच ठार झाल्याची घटना शनिवारी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास घडली आहे. गेवराई तालुक्यातील पाचेगाव जवळील एका तांड्यावरील रहिवासी असलेले लहु गोविंद आडे वय वर्षे ४४ हे शनीवारी सकाळी आपल्या दुचाकीवरून जात असताना असताना



कल्याण - विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्गावरील अर्धा मसला शिवारातील एका पेट्रोल पंपावरून बाहेर पडत असताना गढी येथून माजलगाव कडे जाणाऱ्या चारचाकी वाहन क्रमांक एम एच ४४ टी ८७८६ या वाहनाच्या चालकाने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात लहु आडे यांच्या डोक्याला व पायाला गंभीर दुखापत झाल्याने ते जागीच ठार झाले असून यावेळी परीसरातील नातेवाईकांनी तात्काळ या चारचाकी वाहनाचा पाठलाग केला व सदरील वाहन ताब्यात घेऊन गेवराई येथील पोलिस ठाण्यात लावण्यात आले आहे. दरम्यान मयतावर गेवराई येथील उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले असून दुपारी मयतावर तांड्यावरील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेचा पंचनामा तलवाडा पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी डोंगरे यांनी केला आहे. मयताच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, आई ,वडील, भाऊ, बहीण असा परिवार आहे. या घटनेची उशीरा पर्यंत तलवाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली नव्हती.

# एमपीएससी च्या दिरंगाईचा राज्यसेवेच्या शेकडो उमेदवारांना फटका!

नागपूर। प्रतिनिधी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) तीन महिन्यांपूर्वी राज्यसेवा २०२३ परीक्षेचा निकाल जाहीर केला. त्यानंतर अपिल वैद्यकीय तपासणीही झाली. परंतु, आयोगाच्या ढिसाळ कारभारामुळे तीन महिन्यांनंतरची संपूर्ण प्रक्रिया रखडली आहे. उत्तीर्ण उमेदवारांना पसंतीक्रम देणे, त्यानंतर पुन्हा तात्पुरती यादी जाहीर करणे, भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (ऑप्टिंग आऊट) पर्याय देणे आणि त्या पुढच्या सर्वच प्रक्रिया थांबल्या आहेत. त्यामुळे राज्यसेवेसारखी महत्त्वाची परीक्षा उत्तीर्ण होऊनही परीक्षार्थ्यांच्या परदी निराशा आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून जून २०२३ साली राज्यसेवा गट-अ आणि गट-ब दर्जाच्या ३०३ पदांसाठी परीक्षा घेण्यात आली. त्यानंतर जानेवारी २०२४ मध्ये मुख्य परीक्षा व ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यात मुलाखती घेण्यात आल्या. त्यानंतर उमेदवारांची सर्वसाधारण गुणवत्ता यादी




आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली. महेश अरविंद घाटुळे प्रथम तर प्रीतम मधुकर सानप याने दुसरा क्रमांक पटकावला आहे. नागपूरच्या वैष्णवी हरिभाऊ बावस्कर हिने मुलींमध्ये पहिला क्रमांक पटकावला. निकाल जाहीर करताना उमेदवारांना लवकरच पदांचे पसंतीक्रम ऑनलाईन सादर करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात येईल, असे आयोगाने स्पष्ट केले होते. परंतु, सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर होऊन तीन महिन्यांचा कालावधी उलटला तरी परिस्थिती ङ्गजैसे थेफ आहे. दोन वर्षांपासून उमेदवार या परीक्षेची तयारी करीत होते. निकालही जाहीर झाला. परंतु, पुढची संपूर्ण प्रक्रिया थांबली आहे. विशेष म्हणजे, मागील काही वर्षांत आयोगाकडून प्रत्येक परीक्षा आणि निकालाच्या प्रक्रियेला विलंब होत आहे. त्यामुळे उमेदवारांना प्रचंड मनस्ताप होत आहे. एकाच परीक्षेसाठी अनेक वर्षे वाट बघत राहावे लागल्याने उमेदवारांची चिंता वाढली आहे. सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर आयोगाकडून पसंतीक्रम मागवला जातो. त्यानंतर पुन्हा तात्पुरता निकाल जाहीर केला जातो. या निकालानंतर भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याची संधी दिली जाते. यानंतर अंतिम निकाल जाहीर होतो. हा निकाल शासनाकडे देऊन नियुक्तीची प्रक्रिया केली जाते.

# कोकाटे आणि मुंडेंचे रक्षण म्हणजे भाजपचे हिंदुत्व का?-उद्धव ठाकरे

मुंबई। प्रतिनिधी एकीकडे बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण आणि कृषी खात्यातील कथित घोटाळ्यामुळे राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. तर दुसरीकडे मुख्यमंत्री कोट्यातून दिल्या जाणाऱ्या सदनिका या बनावट दस्तऐवज तयार करून लाटल्या प्रकरणात कृषीमंत्री ड. माणिकराव कोकाटे देखील अडचणीत आले आहे. या दोन्ही नेत्यांच्या राजीनाम्याची मागणी सध्या विरोधकांकडून केली जात आहे. आता शिवसेना ठाकरे गटाचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी धनंजय मुंडे आणि माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्यावरून भाजपवर हल्लाबोल केलाय. तसेच उद्धव ठाकरे यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यावरही निशाणा साधलाय. उद्धव ठाकरे म्हणाले की, धनंजय मुंडे आणि माणिकराव कोकाटे यांचे रक्षण करणे हेच भाजपचे हिंदुत्व आहे का? न्यू इंडिया बँक बुडाली. ती कोणामुळे बुडाली? यांचे रक्षण करणे हे भाजपचे हिंदुत्व आहे का? माझ्या हिंदुत्वाची काहीतरी व्याख्या व्यवस्थित आहे. मात्र भाजपच्या हिंदुत्वाची व्याख्या काय? असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला. माणिकराव कोकाटे यांच्या बाबतीत न्यायालयाने शिक्षा दिली आहे. त्यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वे कर यांनी माझ्या हातात अजून प्रत आलेली नाही, असे म्हटले. याबाबत विचारले असता उद्धव ठाकरे म्हणाले की, आता न्यायालयाने सुद्धा तत्परता दाखवण्याची गरज आहे. आमच्या बाबतीत न्यायालयाचा निकाल तीन वर्ष होऊन देखील तो अजून लागतच आहे. तीन-चार न्यायाधीशांची कारकीर्द पूर्ण झाली, तरी तो निकाल लागलेला नाही.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार २४ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com



## उपोषणासाठी सर्वांनी मस्साजोगकडे जायचं, देशमुख कुटुंबियांच्या पाठीशी रहा : मनोज जरांगे



जालना : देशमुख कुटुंब आमरण उपोषणाला बसण म्हणजे दुर्दैव आहे. देशमुख कुटुंब उपोषणाला बसले तर मी राज्यातील मराठा समाजाला सांगतो की, सगळ्यांनी मस्साजोगकडे जायचं. सगळ्यांनी देशमुख कुटुंबाच्या पाठीमागे उभा राहायचं, असे आवाहन मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे पाटील यांनी केले. काल दुपारी अंतरवाली सराटी येथे जरांगे पाटील यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला यावेळी ते बोलत होते. जरांगे पुढे म्हणाले, आज देशमुख कुटुंब संकटात आहे, माणुसकी म्हणून बघायच असेल तर देशमुख कुटुंबाकडे बघावा लागेल. उपोषण साधी गोष्ट नाही, माझी त्यांना विनंती आहे की, उपोषण करू नका. संतोष देशमुख यांची बदनामी करण्यासाठी षडयंत्र रचले होते. ते कोणत्या मंत्र्यांनी करायला लावलं, त्यात एका बाईला आणि पोलिसांना कोणाकोणाचे फोन केले. धनंजय मुंडे यांनी फोन केले का? याचे देखील सीडीआर काढले पाहिजे. यात बडा नेता कोण, बडा नेता कोण हे उघड पडू द्या. मागण्यांची पूर्तता करण्यासाठी सरकारचे एखाद शिष्टमंडळ तिथे जाण गरजेचे आहे, अशी मागणी देखील जरांगे यांनी यावेळी केली.

# जोपर्यंत स्व.संतोष देशमुखांना न्याय मिळणार नाही तोपर्यंत मी सत्कार स्वीकारणार नाही : आ.सुरेश धस

### उस्मानाबाद येथे आयोजित कार्यक्रमामध्ये सुरेश धस यांनी सत्कार नाकारला

बीड : जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली, या घटनेनंतर आता राज्यात वातावरण चांगलंच तापलं आहे. राजकीय आरोप-प्रत्यारोप देखील होताना दिसत आहेत.या प्रकरणात भाजप आमदार सुरेश धस यांनी सुरुवातीपासूनच आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांनी शनिवारी मस्साजोगमध्ये जाऊन संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची तसेच ग्रामस्थांची भेट घेतली. या भेटीनंतर आता त्यांनी आज मोठी घोषणा केली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात न्याय मिळत नाही, तोपर्यंत स्वागत सत्कार स्वीकारणार



नाही, असं सुरेश धस यांनी म्हटलं आहे. उस्मानाबाद येथे आयोजित एका कार्यक्रमामध्ये त्यांनी सत्कार नाकारला आहे. मंत्री जयकुमार गोरे यांची उस्मानाबाद जिल्हा संपर्क प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली. तसेच भाजप नेते सुजितसिंह ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. भाजप आमदार सुरेश धस या कार्यक्रमाला उपस्थित होते. मात्र त्यांनी सत्कार नाकारला आहे. जोपर्यंत संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात न्याय मिळत नाही, तोपर्यंत आपण सत्कार स्विकारणार नाही, असं त्यांनी म्हटलं आहे. दरम्यान शनिवारी सुरेश धस हे परळी दौऱ्यावर होते. त्यापूर्वी त्यांनी मस्साजोगमध्ये जाऊन पुन्हा एकदा संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची आणि तेथील ग्रामस्थांची भेट घेतली. ग्रामस्थांचा आपल्याला पाठिंबा असल्याचा दावा देखील त्यांनी केला. परळी दौऱ्यात मात्र त्यांना विरोध झाल्याचं पाहायला मिळालं. सुरेश धस हे परळीचं नाव बदनाम करत असल्याचा आरोप करत त्यांच्याविरोधात आंदोलन करण्यात आलं. जोरदार घोषणाबाजी करत त्यांना काळे झेंडे देखील दाखवण्यात आले. सुरेश धस यांनी काही दिवसांपूर्वी मंत्री धनंजय मुंडे यांची भेट घेतली होती. ही भेट सध्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली आहे. यावरून मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी देखील सुरेश धस यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. आपण मुंडे यांच्या तब्येतीची चौकशी करण्यासाठी त्यांची भेट घेतल्याचं स्पष्टीकरण या भेटीवर सुरेश धस यांनी दिलंआहे

# ग़ज़लकार, नाटककार फिरोज काझी यांना यंग रायटर अवॉर्ड २०२४ पुरस्कार जाहीर

बीड-प्रतिनिधी महात्मा गांधी एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी या संस्थेच्या वतीने देण्यात येणारा बेस्ट यंग रायटर अवॉर्ड २०२४ हा पुरस्कार नाट्य क्षेत्रातील संवेदनशील नाटककार आणि हिंदी-उर्दू गझलकार श्री फिरोज काझी यांना जाहीर झाला आहे. महात्मा गांधी एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी तर्फे दरवर्षी हा पुरस्कार सामाजिक, शैक्षणिक, कला आणि क्रीडा क्षेत्रात काम करणाऱ्या आणि सामाजिक भान जोपासणाऱ्या व्यक्तींना दिला जातो. यावर्षीचा हा पुरस्कार आपल्या लेखनातून सामाजिक



क्रांती घडविणाऱ्या श्री फिरोज काझी यांना जाहीर झाला आहे. गझल म्हटलं की प्रियकर प्रियसीच्या प्रेम शृंगार आणि विरहाची एक कथाच असते. फिरोज काझी यांनी आपल्या गझलमध्ये प्रियकर प्रियसीच्या प्रेमाची उत्कटता मांडलेली आहे. परंतु यासोबतच त्यांनी आपल्या गझलमध्ये अनेक सामाजिक मुद्द्यांना देखील स्पर्श केलेला आहे. त्यांच्याच शब्दात सांगायचे झाले तर, मता-उम्र किया हमने सफर फूलों का, इसीलिये है हमपर असर फूलों का।फ एकीकडे अशी शृंगारिक उधळण करत असतांनाच हा शायर पुढे महिला अत्याचारावर गंभीर होताना म्हणतो, ङ्गअच्छी सुरत को उसकी खुबसूरती मार गयी, किस्मत वालो को उनकी बद-किस्मती मार गई। मां की कोख से बची तो बहुत खुश हुई थी वो, उस मासूम बच्ची को आज उसकी जवानी मर गई। प्रचंड शब्द साठा, शाब्दिक सौंदर्य आणि मनातील संवेदनशीलतेने १२०० च्या वर गझल लिहून या शायरने आजच्या तरुणाईला सामाजिक भान शिकवले. मजाने क्यूँ रखते है लोग इसे इतना संभाल के, मुझे भी देखना हैं दिल को बाहर निकाल के।फ असं म्हणत हा शायर कधी बेभान होतो तर कधी, म शर्त मंजिल की रास्तो से लगा के दिखा, जरा गर्दीश के तारों को आजमा के दिखा। मैं गुजरा हूँ जिन हादसों से, तू भी गुजर ज़ा, उसके बाद मेरी तरह मुस्कुरा के दिखा। असं म्हणत आत्मविश्वास हरवलेल्या तरुणांमध्ये ऊर्जा भरण्याचं काम फिरोज काझी यांनी केलं आहे. फिरोज काझी रंगभूमीवरील उत्तम नाटककार म्हणूनही प्रसिद्ध आहेत. त्यांच्या महे रामम, मछत्रपती शिवरायांचा जिहादफ, ङ्गसन्माननीय षंढानोंफया नाटकातून त्यांनी विविध सामाजिक प्रश्नांना रंगभूमीवर मांडून प्रेक्षकांना रडवले, तर मथ्री इडियट्सफ, ममंगलम गोंधळमंफ, महेराफेरीफ, मआम्ही सारे उचपातीफ अशा विनोदी नाटकातून त्यांनी रसिकांना खळखळून हसवले आहे. फिरोज मराठी रंगभूमीवरील उत्तम अभिनेते आणि दिग्दर्शक ही आहेत.

## वातावरणातील बदलामुळे रुग्णसंख्येत वाढ;

### व्हायरल इन्फेक्शनमुळे सर्दी-खोकला, ताप

पिंपळनेर-प्रतिनिधी बीड तालुक्यातील पिंपळनेसह परिसरात काही दिवसांपासून वातावरणात होत असलेल्या बदलांमुळे व्हायरल रुग्णांमध्ये वाढ झाली आहे. व्हायरल इन्फेक्शनमुळे सर्दी-खोकला, तापाचे रुग्ण वाढले आहेत. तापमानाचा पारा आता २३ ते २८ अंशांवर गेला आहे. यामुळे कडक उन्हाचे चटके बसत आहेत. मात्र दुपारी ऊन आणि रात्री हवेत गारवा जाणवत असल्याने घरोघरी रुग्ण आढळून येत आहेत. वातावरणात वेळोवेळी बदल होत आहे. दुपारी ऊन आणि सायंकाळी व रात्री हवेत गारवा निर्माण होत आहे. यामुळे बालकांसह वयोवृद्धांना व्हायरल इन्फेक्शनचा त्रास सहन करावा लागत आहे. सर्दी, खोकला, थंडी, ताप, अंगदुखी, घसा खवखवणे इ. आजार प्रामुख्याने सर्वत्र दिसून येत आहेत. त्यामुळे खासगी व सरकारी रुग्णालयांमध्ये गर्दी दिसून येत आहे. पिंपळनेर येथील रुग्णालयात दररोज ओपीडीमध्ये १०० च्या आसपास रुग्ण हे सर्दी, खोकला व तापाचे असल्याचे रुग्णालयाच्या वतीने सांगण्यात आले आहे. तर खासगी रुग्णालयातदेखील या आजाराचे रुग्ण आहेत. वातावरणात होणारे बदल, बदलते तापमान हे व्हायरल इन्फेक्शनसाठी कारणीभूत ठरत असल्याचे डॉक्टर सांगत आहेत. पाच वर्षांच्या आतील बालक, वृद्ध व्यक्ती यांना रोगांची अधिक लक्षणे आढळत आहेत. अशावेळी गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे. व्हायरलची लक्षणे आढळल्यास तत्काळ उपचार घ्यावे, असा सल्ला डॉक्टर देत आहेत. पिंपळनेर प्रा.आ. केंद्रात वाढली गर्दी पिंपळनेर सह परिसरातील खाजगी सह इतर रुग्णालयांमध्ये रुग्णांची गर्दी वाढली असून. उपचार घेण्यासाठी येथील शासकीय रुग्णालयातही ओपीडीत व्हायरल रुग्ण दाखल होत आहेत. वातावरणातील बदलत्या स्थितीमुळे व्हायरलचा त्रास होत आहे. जसजसा उन्हाचा पारा वाढण्यास सुरवात होईल. तसतसे व्हायरलचे रुग्ण कमी होण्यास मदत होईल. - डॉ. चव्हाण साहेब प्रभारी, वैद्यकीय अधिकारी, पिंपळनेर अशी घ्यावी लहान मुलांची काळजी लहान मुलांमध्ये वातावरणातील बदलामुळे ताप, थंडी, सर्दी, खोकला यांसारखे आजार बळावतात. त्यामुळे आइस्क्रीम, जंकफूड, तळलेले व शिळे पदार्थ; तसेच फ्रीजमध्ये ठेवून असलेले अन्न मुलांना खायला देणे टाळावे. शिवाय नियमित कोमट पाणी पिण्यास द्याव

# बिहारच्या धर्तीवर महाराष्ट्रातही जातनिहाय जनगणना करा : अर्जुन दळे

बीड : बिहारच्या धरतीवर महाराष्ट्र राज्यात जातनिहाय जनगणना करावी, या प्रमुख मागणीसह ओबीसींच्या प्रलंबित मागण्यांबाबत जिल्हाधिकारी यांच्या मार्फत राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांना ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष अर्जुन दळे यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले. ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हाधिकारी यांना २० फेब्रुवारी रोजी विविध आंदोलनातून निवेदन देण्यात आले आहे. बिहारच्या धरतीवर राज्यात जातनिहाय सर्वे करण्यात यावा. विदेशातील उच्च शिक्षणाकरिता शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत ओबीसी विद्यार्थ्यांना पात्र ठरविण्यासाठी आणि ओबीसी संवर्गातील विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजनेस



पात्र ठरविण्यासाठी नॉन क्रीमिलीयर प्रमाणपत्र व ८ लाख रुपये उत्पन्नाची अट अशा दोन अटींपैकी ८ लाख रुपये उत्पन्नाची अट रद्द करून फक्त नॉन क्रीमिलीयर प्रमाणपत्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ देण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यात यावा. मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी रासपचे जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर, सावता परिषदेचे राज्य प्रवक्ते डॉ. राजु काळे, सुतार संघटनेचे जिल्हाध्यक्ष बापुराव भालेकर, नाभिक समाजाचे युवराज शिंदे, सुरेंद्र कावरे, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष विशाल राऊत, चंदु ठोंबरे सहभागी होते.

# बीडच्या तीन महिला जिजाऊ रत्न पुरस्काराने सन्मानित

### शिवजयंतीनिमित्त महिला मराठा क्रांती ग्रुपचा उपक्रम

बीड - शिवजयंतीनिमित्त महिला मराठा क्रांती ग्रुपच्या वतीने यंदा बीडमधील तीन महिलांना जिजाऊ रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.महिला मराठा क्रांती ग्रुप दरवर्षी शिवजयंतीनिमित्त हा उपक्रम राबविला जातो. शांतिनिकेतन इंग्लिश स्कूलमध्ये शिवजयंतीनिमित्त कार्यक्रम झाला. या पुरस्काराचे वितरण डॉ अशोक कोल्हे, माजी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सध्याचे कार्यकारी अधिकारी सारथी, पुणे, डॉ प्रमोद शिंदे सर, मराठा क्रांती मोर्चा समन्वयक, बीड नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष दिलीप अण्णा गोरे, विठ्ठल गोरे सर, यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात शिवमती सीताबाई बलभीमराव जाधव, शिवमती निलावती मच्छिंद्र गायकवाड, शिवमती अश्रुगा उत्तरेश्वर जाधव यांना जिजाऊ रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रास्ताविक करताना रत्नमालाताई धांडे यांनी पुरस्कार देण्याचा उद्देश सांगताना ज्या माता भगिनी आपली कौटुंबिक जबाबदारी पार पाडत मुलांवरती सामाजिक संस्कार करतात अशा माता भगिनींचा सत्कार व्हावा या शुद्ध हेतूने पुरस्कारने सन्मानित करण्यात येते. कुंदाताई काळे यांनी या पुरस्काराची व्याप्ती राज्यभर असून पुढील वर्षापासून सांगली सातारा या ठिकाणच्या माता भगिनींना पुरस्कार देण्याचा मानस व्यक्त केला. तसेच दिलीप अण्णा गोरे यांनी पुरस्कार देण्यात आलेल्या सर्व मातांचे अभिनंदन करत महिला क्रांती मोर्चाचे या कार्यक्रमाबद्दल जाहीर आभार मानले. डॉक्टर अशोक कोल्हे यांनी सारथी अंतर्गत चालू असलेल्या विविध योजनांची माहिती उपस्थितांना दिली. यामध्ये प्रामुख्याने परदेशी शिक्षणासाठी एम एस व परदेशामध्ये पीएचडी करण्यासाठी मिळणाऱ्या शिष्यवृत्तीची संपूर्ण माहिती दिली. डॉक्टर प्रमोद शिंदे यांनी आयोजकांचे कौतुक करत सर्वांचे अभिनंदन केले. यावेळी सी ए बी बी जाधव यांनी महिला मराठा क्रांती मोर्चाचे आभार मनात आईचे ऋण प्रत्येक व्यक्तीवर आयुष्यभर असतात आणि ते अशा कार्यक्रमाच्या निमित्ताने व्यक्त करण्याची संधी निर्माण केल्याबद्दल सर्व आयोजकाचे आभार मानले.



This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com